|| अंतरी पेटवू ज्ञा-ज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभाग

## विद्यापीठ कार्यालयास प्लॅस्टीक फोल्डर, नोट पॅड,(PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो छपाईसह) व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीची निविदा.

भाग 01 ते 04

**पेजेस - 01 ते 8**

दुरध्वनी क्रमांक :- 0257- 2257415, 416

विद्यापीठ संकेतस्थळ :- www.nmu.ac.in

जा. क्र. : कबचौउमवि/19/आजीवन अध्ययन/स्टेशनरी निविदा/100/2024, दि.03.10.2024

**निविदा स्विकारण्याची अंतिम दि. 24/10/2024**

किंमत रु.4,000/-

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**प्लॅस्टीक फोल्डर, नोट पॅड विद्यापीठ व PMUSHA नाव व लोगो छपाईसह व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीची निविदा**

## भाग-1
## निविदाधारकाची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | निविदा सुचना संदर्भ व तारीख | :- | जा.क्र.: कबचौउमवि/आजीवन अध्ययन/स्टेशनरी निविदा/100/2024, दि. 03.10.2024 |
| 2) | पुरवठादाराचे नांव व संपूर्ण पत्ता | :- | |
| 3) | दुरध्वनी, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी | :- | |
| 4) | व्यवसायातील अनुभव | :- | |
| 5) | * शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशन क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 6) | * जी.एस.टी. (GST) नोंदणी क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 7) | * पॅन कार्ड क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 8) | * मागील तीन वर्षाची वार्षिक उलाढाल पत्रके (लेखापत्रक जोडणे आवश्यक) | :- | |
| 9) | निविदा किंमत व बयाणा रक्कम भरणा केल्याचा तपशील. ऑनलाईन भरणा पावती जोडावी अथवा धनाकर्ष क्रमांक, तारीख | :- | |
| 10) | सध्या कोणकोणत्या संस्थांना निविदेतील नमूद साहित्य पुरवठा करतात त्याचा तपशिल (सोबत ग्राहकांची यादी जोडावी) | :- | |
| 11) | कंपनीचे अधिकृत विक्रेते आहात त्याचा तपशील देऊन त्या संबधीचे कंपनीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | :- | |

(* चिन्हांकीत राहणाऱ्यासाठी सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे)

निविदाधारकाची सही व शिका

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव.

## प्लॅस्टीक फोल्डर, नोट पॅड विद्यापीठ व PMUSHA नाव व लोगो छपाईसह व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीची निविदा

## भाग - 2 निविदा अटी व शर्ती

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या PMUSHA योजनेअंतर्गत विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील कार्यशाळेसाठी आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागास आवश्यक असणारे स्टेशनरी साहित्य खरेदी करावयाचे आहे. सदर निविदेच्या शर्ती व वर्णनानुसार साहित्याचे भाव सीलबंद पाकिटातून दि. /09/2024 पर्यत कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्या आवक विभागात जमा करावे.

## निविदा शर्ती

१) निविदेसोबत निविदा किंमत रू.4,000/-(अक्षरी रू.चार हजार मात्र) व बयाणा रक्कम रू.20,000/-(अक्षरी रू.वीस हजार मात्र)चा मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव (Finance and Accounts Officer, K.B.C.N.M.U.,Jalgaon) यांच्या नावाने बँक ऑफ महाराष्ट्र बांभोरी शाखा, जळगाव चालू खाते क्रमांक 60431102620(IFSC Code- MAHB0001422) या खाते क्रमांकावर ऑनलाईन भरणा करावी लागेल. त्यासाठी खालील लिंक व QR Code वरून भरणा करता येईल.

ऑनलाईन पध्दतीने भरणा करताना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास निविदाधारक हे राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्षाव्दारे सुध्दा भरणा करू शकतील. निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहिल.

https://edu.easebuzz.in/register/NorthkG6e3/Tender_Fees_EMD

राज्य व राष्ट्रीय लघु, मध्यम उद्योगाचे नोंदणीकृत पुरवठादारांनी (NSIC, MSME, Registered Suppliers) यांना देखील निविदा शुल्क (Tender Fee) व बयाणा शुल्क (Earest Money) भरणे अनिवार्य राहिल.

२) विक्रीकर कायद्यानुसार नोंदणीधारक निविदाधारकांचीच निविदा विचारात घेतली जातील. सदरची संपूर्ण निविदा ही दोन भागात तांत्रिक निविदा (Technical Bid) व दरांची निविदा (Price Bid) मध्ये विभागलेली असून तांत्रिक निविदे अंतर्गत भाग 1 ते 3 समाविष्ट आहेत व भाग-4 मध्ये (Price Bid)समाविष्ट आहे. भाग 1 ते 3 मधील कागदपत्रे एका स्वतंत्र पाकीटात व भाग-4 वेगळया पाकीटात टाकून दोन्ही सिलबंद पाकिटी स्वतंरित्या जमा करावेत. सिलबंद निविदा पाकिटावर "प्लॅस्टीक फोल्डर, नोट पॅड विद्यापीठ व PMUSHA नाव व लोगो छपाईसह व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीची निविदा" (भाग 1 ते 3 व भाग-4) असे स्पष्ट नमूद करावे. निविदा पाकीटांवर स्पष्ट उल्लेख नसल्यास त्याचप्रमाणे पाकिटे व्यवस्थित सिलबंद केलेली नसल्यास दरांची निविदा (Price Bid) विचारात घेतली जाणार नाही.

३) निविदाधारकाने स्टेशनरी साहित्य अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले नसल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४) कोणत्याही कारणास्तव विहीत मुदतीनंतर उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

५) निविदेतील दर हे सर्व करांसह विद्यापीठ पोहोच द्यावेत.

६) ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर झाली त्यांनी विद्यापीठाचे निविदा स्विकृतीचे पत्र प्राप्त झाल्यापासून 07 दिवसांच्या आत सुरक्षा अनामत (Security Deposit) रक्कम रू.30,000/-(अक्षरी रू.तीस हजार मात्र) ऑनलाईन पध्दतीने (स्वतंत्रपणे QR Code पुरविण्यात येईल) अथवा वित्त व लेखा अधिकारी,कबचौउमवि, जळगांव (Finance and Accounts Officer, KBCNMU, Jalgaon) यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बॅंकेच्या धनाकर्षाद्वारे जमा करावयाची आहे. सदरची रक्कम ही विनाव्याजाने राहिल. तसेच त्यासाठी निविदेतील नमुद अटी व शर्ती मान्य

करण्यात आलेल्या दराप्रमाणे साहित्य पुरवठा करण्यासाठी बांधिल राहीत या संदर्भात रू.200/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

७) निविदा मान्य करताना फक्त दरांचाच विचार केला जाणार नसून मालाचा दर्जाचा, निविदाधारकांच्या दर्जाचा, निविदाधारकांच्या सेवासंहितेच्या संबंधातील मागील अनुभव इ. बाबींचा विचार केला जाईल.

८) भाग -3 मध्ये नमूद केलेल्या साहित्याचे मूळ उत्पादक कंपनीचे नाव, प्रॉडक्ट नंबर इ. बाबींचा तपशील देणे आवश्यक आहे.

९) **करारानुसार मान्य झालेले दर हे दोन वर्षांच्या कालावधीसाठी बंधनकारक राहतील**.

१०) **निविदाधारकाने पुरवावयाच्या साहित्याचे सॅम्पल निविदेसोबत जोडणे आवश्यक राहिल**.

११) नियमानुसार विविध करांची रक्कम बिलातून परस्पर वसूल करण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल.

१२) ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत होईल त्यांनी मागणी केलेल्या साहित्याचे सॅम्पल प्रमाणे साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक राहिल. यात दिरंगाई केल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व त्यांच्या फर्मचे नाव कायमस्वरूपी काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल.

१३) साहित्य पुरवठा करण्यास नकार दिल्यास तसेच वेळोवेळी विद्यापीठाच्या गरजेनुसार साहित्य न पुरविल्यास किंवा त्यास दिरंगाई केल्यास निविदाधारकांची सुरक्षा अनामत कायमस्वरूपी जप्त करण्यात येईल व खुल्या बाजारातून सदर साहित्य खरेदी केले जाईल व सदर व्यवहारात विद्यापीठास नुकसान पोहोचल्यास सदर तुट निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

१४) सशर्त (Conditional) निविदा स्वीकारली जाणार नाही.

१५) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा, फेटाळण्याचा, अटीत संपूर्ण किंवा अंशत: बदल करण्याचा किंवा करार संपुष्टात आणण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

१६) संभाव्य वादविवाद जळगांव न्यायालय अंतर्गत विचाराधीन राहतील.

१७) निविदाधारकांस कोणताही ॲडव्हॉन्स दिला जाणार नाही तसेच खरेदी आदेशातील साहित्याचा संपूर्ण पुरवठा केल्यानंतर किमान एक महिन्यानंतर देयक अदायगी करण्यात येईल.

१८) निविदा उघडतांना प्रथम तांत्रिक निविदा (भाग 1व 2) उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेत नमूद तपशील, दस्तऐवजे इ. योग्य असल्यासच दरांची निविदा (Price Bid) उघडण्यात येईल.तांत्रिक निविदेतील तपशील, दस्तऐवजे परिपुर्ण व योग्य नसल्यास अशा निविदाधारकांच्या निविदेचा (भाग 3) उघडण्यात येणार नाही.

१९) **PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो छपाईचा मजकुर विद्यापीठामार्फत पुरविण्यात येईल, Art Work अंतीमरित्या मान्य केल्यानंतर पुरवठादाराकडून विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागात पुरवठा करण्यात यावा**

२०) आवश्यकता भासल्यास पुरवठासोबत साहित्याचा पुरवठयाबाबत व दरांबाबत तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यात येईल. त्यासाठी निविदाधारकास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२१) देयक सादर करताना विद्यापीठाचा GST No.27AAAJN0465A1ZL चा उल्लेख करून पक्के बील द्यावे लागेल. तद्नंतर देयकाची अदायगी 15 दिवसानंतर करण्यात येईल.

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
**वित्त व लेखा अधिकारी,**
**कबचौउमवि, जळगांव**

निविदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

|| अंतरी पेटवू ज्ञा-ज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## फोल्डर, नोट पॅड विद्यापीठ व PMUSHA नाव व लोगो छपाईसह व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीची निविदा

## भाग-3 तपशिल

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | संख्या | कंपनी,प्रॉडक्टचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | नोटपॅड (PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो) 70 GSM 10 पानी | 17000 | |
| 2 | प्लॅस्टीक फोल्डर (PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो) एक खाणी (Single fold) | 17000 | |
| 3 | पेन (Use & Throw) | 17000 | |

**निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का**

(साहित्याचे मूळ उत्पादक कंपनीचे नाव, प्रॉडक्ट नंबर इ. बाबींचा तपशील देण्यात यावा.)

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**फोल्डर, नोट पॅड विद्यापीठ व PMUSHA नाव व लोगो छपाईसह व पेन इ.साहित्याचा पुरवठा करण्यासाठीच्या निविदेचा दरांचा भाग**

## भाग - 4 (Price Bid)

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | संख्या | दर प्रती नग | एकुण रक्कम रुपये (GST सह) |
|---|---|---|---|---|
| 1 | नोटपॅड (PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो) 70 GSM 10 पानी | 17000 | | |
| 2 | प्लॅस्टीक फोल्डर (PMUSHA व विद्यापीठाचे नाव व लोगो) एक खाणी (Single fold) | 17000 | | |
| 3 | पेन (Use & Throw) | 17000 | | |

( टिप:- सदरचा दर हा पुढील दोन वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहील. विद्यापीठास आवश्यकता असल्यास या दरात मागणीनुसार अतिरिक्तचा पुरवठा सुध्दा करणे आवश्यक असेल, या अटी निविदाधारकास मान्य आहेत. )

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का